*आता नॉन एसी सभागृहांमध्ये लग्न समारंभांसाठी परवानगी मिळणार*
*शासनाचे परिपत्रक जारी*
*आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश*

लॉकडाऊन दरम्यान लॉन तसेच नॉन एसी सभागृहांमध्ये लग्न समारंभासाठी परवानगी द्यावी अशी मागणी माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाकडे केली होती. त्या मागणीला यश प्राप्त झाले असुन लॉनमध्ये 50 लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग पाळत लग्न समारंभासाठी परवानगी देण्यात आली आहे. आता नॉन एसी सभागृहांमध्ये 50 लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग पाळत लग्न समारंभांसाठी परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक 22 जून 2020 रोजी राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थान, मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव श्री. किशोर राजे निंबाळकर यांनी एक परिपत्रक जारी करून सर्व विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिका-यांना याबाबत निर्देशित केले आहे.

50 लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसींग पाळून खुले लॉन, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय, हॉल, सभागृह येथे लग्न समारंभ पार पाडण्यास तसेच कोविड-19 संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करण्याच्या अटीवर सदर शासन आदेशाद्वारे याबाबत परवानगी देण्यात आली आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या संबंधी केलेल्या पाठपुराव्याला व प्रयत्नांना यश प्राप्त झाले आहे.

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: डी एम यु-२०२०/प्र. क्र.९२/आ.व्य.प्र.-१,
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ जून २०२०.

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) महानगरपालिका आयुक्त (सर्व)
३) जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय :- मंगल कार्यालयामध्ये लग्नसमारंभ साजरा करण्यास परवानगी देणेबाबत.**

संदर्भ :- महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्रमांक. डी एम यु-२०२०/प्र. क्र.९२/आ.व्य.-१, दिनांक ३१ मे, २०२०.

कोरोना विषाणूचा राज्यातील वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता लॉकडाऊन दरम्यान गर्दी टाळण्याच्या दृष्टीने केवळ ५० लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग पाळत लग्न समारंभ साजरा करण्याची परवानगी संदर्भिय आदेशान्वये देण्यात आलेली आहे. तथापि, हे लग्न समारंभ कोणकोणत्या ठिकाणी पार पाडता येतील याबाबतचा उल्लेख सदर आदेशांमध्ये नाही. ५० लोकांच्या मर्यादेत घराच्या परिसरात लग्न समारंभ साजरे करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे ५० लोकांच्या मर्यादेतच सोशल डिस्टंसिंग पाळून खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल/ सभागृह येथे लग्न समारंभ पार पाडण्यास परवानगी देण्याबाबतच्या विविध मागण्या शासनाकडे प्राप्त होत आहेत.

वरील सूचना व मागणी विचारात घेता तसेच आता पावसाळा सुरू झाला असल्यामुळे, खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल/ सभागृह, घर व घराच्या परिसरात ५० लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग तसेच कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करण्याच्या अटीवर लग्न समारंभ पार पाडण्यास, नागरिकांकडून मागणी प्राप्त झाल्यास परवानगी देण्यात यावी.

किशोरराजे निंबाळकर

**(किशोर राजे निंबाळकर)**
**सचिव (आ.व्य., म व पु)**

Scanned with CamScanner